

गणेशोत्सवानिमित्त लालबागच्या बाजारात सजावटीचे सामन विक्रीसाठी उपलब्ध झाले आहे. त्याची खरेदी करण्यासाठी ग्राहकांची गर्दी होऊ लागली आहे.

**एका तरुण आईचा लिव्हर फेल झालाय. एक १६ वर्षांचा मुलगा ८ महिन्यांपासून डायलिसिसवर आहे. एका शिक्षकाचे हृदय केवळ मशीनच्या आधारावर चालू आहे...**
**या सगळ्यांना हवी आहे दया नव्हे, संधी - एक अवयव, एक 'हो', एक दुसऱ्याचे धाडस!**



# मृत्यूनंतर जीवन देणे ही खरी अमरता!

**डॉ. चेतन आर. कालाल**
**(लिव्हर ट्रान्सप्लांट स्पेशॅलिस्ट व हिपॅटोलॉजिस्ट)**

जागतिक अवयवदान दिन २०२५ च्या निमित्ताने, आपण एक गोष्ट नक्की लक्षात ठेवली पाहिजे - आपल्या मृत्यूनंतर आपण ८ लोकांचे प्राण वाचवू शकतो आणि ७५ जणांचे जीवन चांगले करू शकतो.

भारतात संधी आहे, पण जागरूकता कमी!

भारतात दरवर्षी हजारो लोक अवयव न मिळाल्यामुळे मृत्युमुखी पडतात. पण आपला अवयवदान दर फक्त ०.६५ प्रति दशलक्ष लोकसंख्या आहे.

स्पेनसारखा देश ३५ च्या वर आहे. फरक विज्ञानात नाही, तर मानसिकतेत आहे.

धार्मिक शंका? गैरसमज?

माझ्या धर्मात चालेल का?

माझे शरीर नीट ठेवतील का?

कुटुंब तयार असेल का?

सर्व प्रमुख धर्म - हिंदू, मुस्लीम, ख्रिस्ती, शीख - अवयवदानाला पुण्यकर्म मानतात

शरीराला पूर्ण सन्मान दिला जातो. कुटुंबाची लेखी संमती आवश्यक असते.

**लिव्हरचे विशेष महत्त्व**

लिव्हर हे एकमेव अवयव आहे जे शरीरात पुन्हा वाढते(regenerate होतं).

लिव्हिंग डोनर लिव्हर ट्रान्सप्लांट आता सुरक्षितपणे भारतात मोठ्या प्रमाणावर होत आहे. पण भीती, अपुरी माहिती आणि वेळेवर निर्णय न घेणे - यामुळे अनेक रुग्ण संधी गमावतात.

आज तुम्ही काय करू शकता?

नोंदणी करा: www.notto.nic.in

कुटुंबाला सांगा - त्यांची माहिती असणे महत्त्वाचे आहे

गैरसमज दूर करा - लोकांमध्ये योग्य माहिती पोहोचवा

जीवनदान हीच खरी प्रेरणा मानूया

शेवटचे पण महत्त्वाचे

अवयवदान म्हणजे फक्त मृत्यूनंतरचे दान नाही - ही एक अमर झालेली कृती आहे.

कोणीतरी तुमच्यामुळे पुन्हा श्वास घेईल, चालेल, खिशात औषधे न ठेवता जगेल

आज निर्णय घ्या. उद्या कोणीतरी Thank you for saving my life म्हणेल - जरी तुम्ही तिथे नसाल, तरीही. दान करा. जीवन द्या. अमर व्हा.

एम.ए.एफ.एल.डी. (MAFLD) - यकृताचा सायलंट किलर

यकृतावर १०% पेक्षा जास्त चरबी साठल्यावर तो एम.ए.एफ.एल.डी. म्हणजेच Metabolic Dysfunction-Associated Fatty Liver Disease म्हणवला जातो. ही चरबी हळूहळू यकृताची कार्यक्षमता कमी करते आणि सुरुवातीला काही लक्षणे नसल्यामुळे हा आजार सायलंट किलर ठरतो.

आधुनिक, धावपळीच्या, तणावपूर्ण आणि अनियमित जीवनशैलीसोबत चुकीचा आहार, बसून काम करण्याची पद्धत, झोपेचा अभाव - हे सगळे या आजाराचे प्रमुख कारण आहे. महत्त्वाचे म्हणजे - मद्यपान न करणाऱ्या व्यक्तींनाही हा आजार होतो.

# बुलडाण्याच्या जिगाव येथील पूर्णा नदीत वाहून गेलेल्या आंदोलकाचा मृतदेह सापडला

■ बुलडाणा



**बुलडाण्यातील** जिगाव प्रकल्पावरील जलसमाधी आंदोलनादरम्यान पूर्णा नदीत उडी घेतल्यानंतर वाहून गेलेले आंदोलक विनोद पवार यांचा मृतदेह ४४ तासांच्या शोधमोहिमेनंतर १४ किलोमीटर अंतरावर आढळून आला. या घटनेला जिल्हा प्रशासन जबाबदार असल्याचा आरोप मृत पवार यांच्या पत्नीने केला आहे. कुटुंबासाठी ५० लाखांची आर्थिक मदत व एका सदस्याला शासकीय सेवेत नोकरी देण्याची मागणी करण्यात आली आहे. १५ ऑगस्ट रोजी जिगाव प्रकल्पाजवळील आडोळ खुर्द येथे गावकऱ्यांनी पुनर्वसन आणि रस्त्यांच्या मागण्यांसाठी जिल्हा प्रशासनाविरोधात प्रतिकात्मक जलसमाधी आंदोलन छेडले होते. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात गावाचा समावेश असूनही जमीन व मोबदल्याचा प्रश्न सुटलेला नाही. आंदोलनादरम्यान विनोद पवार यांनी पूर्णा नदीत उडी घेतली होती व ते वाहून गेले होते . या घटनेने प्रशासन व पोलिसांत खळबळ उडाली होती. त्यानंतर तत्काळ शोधमोहीम राबविण्यात आली; मात्र अंधारामुळे पहिल्या दिवशी शोध थांबवावा लागला. दुसऱ्या दिवशी अकोला व नांदुरा येथील पथकांनी नदी पात्रात शोधकार्य सुरू ठेवले आणि ४४ तासांनंतर पवार यांचा मृतदेह सापडला.

# खोपोलीत १४० मतदारांची दुबार नावे ! आपचा आरोप

■ रायगड

खोपोली शहरातील प्रभाग क्रमांक १० मध्ये मतदार यादीत १४० मतदारांची नावे दोन वेळा असल्याचा आरोप आम आदमी पक्षाने केला. यासंदर्भात २ दिवसांपूर्वी आप पक्षाने निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल केली. परंतु त्यासंदर्भात आयोगाने कोणतेही उत्तर दिलेले नाही. ४ ते ५ हजार मतदार असलेल्या या प्रभागात १४० मतदारांची नावे दोन वेळा यादीत आढळली. हा गैरप्रकार उघडकीस आणणार्या डॉ. रिहान पठाण यांनी सांगितले की, शिळफाटा भागातील प्रभाग क्रमांक १० च्या मतदार यादीचा अभ्यास करत असताना ही गंभीर चूक आढळली. फक्त एका प्रभागातील यादी तपासल्यावर दुबार मतदारांचा एवढा मोठा आकडा आढळला. यावरून इतर याद्यांत किती गोंधळ असेल, याचा अंदाज लावणे कठीण नाही. त्यामुळे आमच्या पक्षाने निवडणूक आयोगाकडे मतदारांची नावे यादीत दोन वेळा आहेत, त्यांचे फॉर्म क्रमांक ७ भरून एक नाव रद्द करावे. मयत मतदारांची नावेदेखील यादीतून हटवावीत, अशी मागणी केली आहे.



बौद्धजन पंचायत समिती, आम्रपाली महिला मंडळ गौतमनगर, दादर यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्य दिनानिमित्त इ. ८ वी ते पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेल्य विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ व महापालिका सेवानिवृत्त कामगारांचा सत्कार कार्यक्रम तक्षशीला बुद्ध विहार गौतम नगर, दादर या ठिकाणी पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शारवेचे उपाध्यक्ष आयु. संजय गंगाराम कासारे होते. कार्यक्रमास बौ. पं. समितीचे कार्याध्यक्ष आयु. लक्ष्मण भगत, नायगाव गट क्र. १४ चे गटप्रतिनिधी आयु. संदेश रवैरे, माजी नगरसेविका उर्मिला पांचाळ, माजी नगरसेवक सुनील मोरे उपस्थित होते.

# धाकोरे गावात रस्त्यासाठी ग्रामस्थांचे पुन्हा उपोषण

■ सिंधुदुर्ग

**सावंतवाडी** तालुक्यातील धाकोरे येथील रहिवासी आत्माराम नारायण साटेलकर यांच्यासह ग्रामस्थांनी सार्वजनिक रस्त्यासाठी पुन्हा एकदा उपोषण सुरू केले आहे. तहसीलदार कार्यालयासमोर हे उपोषण छेडण्यात आले. पण अद्याप कोणत्याही अधिकाऱ्याने याची दखल न घेतल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे.

याआधीही २६ जानेवारी आणि १ मे २०२५ रोजी ग्रामस्थांनी उपोषण केले होते. त्या वेळी प्रशासनाने कारवाईचे आश्वासन दिले होते. विशेषतः १ मे रोजी ग्रामपंचायत व गटविकास अधिकारी यांनी ३० दिवसांच्या आत अतिक्रमण काढून रस्ता डांबरीकरण करण्याचे लेखी आश्वासन दिले होते. तेही आजवर पूर्ण झालेले नाही असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. रस्ता मोकळा करून पक्का रस्ता तयार होईपर्यंत उपोषण सुरूच ठेवले जाईल असा निर्धार ग्रामस्थांनी केला आहे.

# चाकणमध्ये पावसामुळे पालेभाज्यांचे दर घसरले

■ चाकण

**खेड** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्डमध्ये आज भाज्यांची मोठ्या प्रमाणात आवक झाली. यात पालेभाज्या, रताळी, बटाटा हिरवी मिरची, टोमॅटो, लसूण आणि कांद्याचा समावेश होता. मात्र पावसामुळे भाज्या भिजल्याने पालेभाज्यांचे दर घसरले. कांद्याची आवक १,००० क्विंटल झाली असून ती मागील आठवड्यापेक्षा १०० क्विंटलने जास्त आहे. त्यामुळे कांद्याचा दर १,५०० वरून १,७०० रुपये झाला. बटाट्याची आवक १,२५० क्विंटल झाली. ही आवक मागील आठवड्यापेक्षा २५० क्विंटलने कमी झाली असून बटाट्याचा दर १,८०० वरून २,००० रुपयांवर पोहोचला. लसणाची आवक ३५ क्विंटल झाली. ती मागील आठवड्यापेक्षा १० क्विंटलने वाढली, तरी त्याचा दर १० हजार रुपये प्रति क्विंटल इतकाच स्थिर राहिला.

**कांदा-बटाटा महागले**



हिरव्या मिरचीची आवक ३२५ क्विंटल झाली असून ती स्थिर आहे. मिरचीला ५ हजार ते ७ हजार रुपये भाव मिळाला.

# नाशिकचा पालकमंत्री मीच गिरीश महाजनांचा दावा

■ धुळे

**नाशिकच्या** पालकमंत्रिपदावरून महायुतीत सुरू असलेल्या तिढा सुटला नसताना भाजपा नेते आणि मंत्री गिरीश महाजन यांनी नाशिकचा पालकमंत्री मीच होणार, असा दावा केला आहे. धुळ्यात एका दहीहंडीच्या कार्यक्रमात त्यांनी हे वक्तव्य केले.

महाजन म्हणाले की,. मी दरवर्षी दहीहंडीसाठी धुळ्याला येतो आणि नाशिकलादेखील जातो. नाशिकचा मीच पालकमंत्री होत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १८ जानेवारी रोजी पालकमंत्र्यांच्या नियुक्तीची घोषणा केली होती. यामध्ये नाशिकसाठी गिरीश महाजन यांची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, या निर्णयाला शिंदे गटाने विरोध केल्याने केवळ एका दिवसातच त्याला स्थगिती द्यावी लागली. तेव्हापासून आजतागायत नाशिकच्या पालकमंत्रिपदाचा निर्णय झालेला नाही.

# युतीचा विचार डोक्यातून काढा खा. प्रफुल्ल पटेलांचे वक्तव्य

■ भंडारा

**स्थानिक** स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये जिथे युती होईल तिथे युती करायची आहे . त्यामुळे युतीचा विचार डोक्यातून काढून टाका असे वक्तव्य राष्ट्रवादी अजित पवार गटाचे खासदार प्रफुल्ल पटेल यांनी केले आहे. भंडाऱ्यात आयोजित कार्मक्रमात कार्यकर्त्यांना संबोधित करताना त्यांनी या सूचना दिल्या आहेत.

यावेळी प्रफुल्ल पटले म्हणाले की, प्रभागात सक्षम उमेदवार आपल्या पक्षाकडे, इतर पक्षाकडे किंवा तिसऱ्या कुणाकडेही असू शकतो. अशावेळी आपल्या कार्यकर्त्याला संधी न देणे चुकीचे आहे. त्याचे मन दुखवण, हे योग्य वाटत नाही. त्यामुळे जिथे सोयीचे वाटेल, तिथे आपण निर्णय घेऊ. सार्वत्रिक निवडणुका म्हणजे मतांचा विचार. आपली ताकत असेल तर आपण लढायचे. प्रत्येक प्रभागात आपलाच उमेदवार उभा राहील या विचाराने आता कामाला लागा. कुठलीही अघोरी शक्ती आपल्याला पराभूत करू शकणार नाही.

# त्र्यंबकेश्वर मंदिरात दरवाजावर लाथा मारत भाविकांचा गोंधळ

■ नाशिक

**नाशिकच्या** त्र्यंबकेश्वर मंदिरात येथे आज मोठा गोंधळ झाला. दर्शन रांगेत वाढती गर्दी लक्षात घेऊन मंदिर प्रशासनाने काही काळासाठी दरवाजा बंद केला होती. त्यामुळे काही भाविकांनी संतापून दारावर लाथा मारल्या. वारंवार समज देऊनही त्यांनी हुल्लडबाजी सुरूच ठेवली. त्यानंतर सुरक्षारक्षकांनी त्यांना चोप दिला.

या घटनेनंतर सुरुवातीला सोशल मीडियावर सुरक्षारक्षकांनी भाविकांना मारहाण केल्याचे व्हिडीओ व्हायरल झाले होते. मात्र, मंदिर प्रशासनाने भाविकांकडून दरवाजावर लाथा मारण्याचे व्हिडीओ सार्वजनिक केल्यानंतर खरा प्रकार उघड झाला. गोंधळ घालणाऱ्या एका भाविकाला पोलिसांनी ताब्यात घेऊन समज दिली. त्यानंतर त्याच्या कुटुंबीयांनी माफी मागितल्याने त्याला सोडण्यात आले. श्रावणात होणारी भाविकांची गर्दी लक्षात घेऊन मंदिर प्रशासनाने सुरक्षेचे अतिरिक्त उपाय केले आहेत आणि भाविकांना संयम बाळगण्याचे आवाहन केले आहे.

# मुरबाडमध्ये आगरी सेनेतर्फे दोनशे विद्यार्थ्यांचा गौरव

■ मुरबाड

**मुरबाड** तालुका आगरी सेनेतर्फे आयोजित भव्य कार्यक्रमात समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांसह सामाजिक कार्यात विशेष योगदान देणाऱ्या मान्यवरांना आगरी समाजरत्न पुरस्कार २०२५ प्रदान करून सन्मानित करण्यात आले. या सोहळ्यात सुमारे २०० विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला.

यावेळी प्रदीप साळवी यांनी पालकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, पालकांनी आपल्या मुलांच्या कला व गुणांची ओळख करून त्यांच्या विकासाला चालना द्यावी. अनेक पालक परदेशात उच्च शिक्षणासाठी मुलांना पाठवतात. मात्र काही मुले परदेशातच स्थायिक होतात, तर काही परत आल्यावर भारतीय अभ्यासपद्धतीचा सामना करावा लागतो. त्यामुळे समाजाच्या आणि देशाच्या विकासाला चालना देणारे शिक्षणच मुलांना द्यावे.


SBI
भारतीय स्टेट बँक
प्रशासकीय कार्यालय ठाणे
1ला मजला, वागळे सरल रोड क्र 22,
वागळे इंडस्ट्रिअल इस्टेट, ठाणे (पश्चिम) - 400604

**व्यावसायिक / कार्यालयीन वास्तूंची आवश्यकता**

भारतीय स्टेट बँक, व्यावसायिक / कार्यालयीन वास्तूंच्या मालकांकडून / पावर ऑफ अटर्नि धारकांकडून भाडेतत्त्वावर कल्याण येथील प्रादेशिक व्यवसाय कार्यालयाकरिता प्रस्ताव मागवित आहे. अधिक तपशिलांसाठी आणि प्रादेशिक व्यवसाय कार्यालय कल्याण, जिल्हा ठाणेचे निविदा पत्रक डाऊनलोड करण्यासाठी, कृपया एसबीआयच्या **https://sbi.co.in/web/sbi-in-the-news/procurement-news** वेबसाईटला **18/08/2025 ते 01/09/2025** दरम्यान भेट द्या. या कार्यालयात प्रस्ताव सादर करण्याचा अंतिम दिनांक आणि **वेळ 01/09/2025 रोजीदुपारी 3:30 पर्यंत** असेल. या संदर्भातील सूचना / स्पष्टीकरण बँकेच्या उपरोक्त वेबसाईटवरच प्रकाशित केली/केले जाईल.

कृपया दलालांनी अर्ज करु नये.

उप महाव्यवस्थापक (बी अँड ओ - ठाणे)
प्रशासकीय कार्यालय, ठाणे


# महसूल मंत्र्यांच्या नावाने शेतकऱ्याची फसवणूक

■ छत्रपती संभाजीनगर

**छत्रपती** संभाजीनगर येथे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नावाने एका शेतकऱ्याची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. तक्रारदार शेतकरी जगन्नाथ जयजी शेळके यांनी याबाबत थेट मंत्र्यांच्या फेसबूक पेजवर तक्रार नोंदवली होती.

अज्ञात व्यक्तीने शेतकऱ्याकडून चार हजार रुपये मागितले होते. या प्रकरणी छत्रपती संभाजीनगर येथील पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेवर प्रतिक्रिया देताना मंत्री बावनकुळे यांनी म्हटले की निकम नावाचा व्यक्ती माझा पीए किंवा परिचित नाही. या फसवणुकीसाठी वापरलेले सर्व कॉल रेकॉर्ड नागपूरचे पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यांच्याकडे तपासासाठी पाठवण्यात आले आहेत.

# काँग्रेसच्या प्रतिभा शिंदे अजित पवार गटात

■ जळगाव

**काँग्रेसच्या** प्रदेश उपाध्यक्षा प्रतिभा शिंदे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटात प्रवेश केला आहे. अजित पवार यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश सोहळा पार पडला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जवळ येत असतानाच झालेल्या या प्रवेशामुळे जळगावमध्ये काँग्रेस पक्षाला धक्का बसला आहे. काँग्रेसमध्ये नाराज असलेल्या प्रतिभा शिंदे यांनी काही दिवसांपूर्वी पक्षाच्या प्रदेशाध्यक्षांकडे राजीनामा सोपवून काँग्रेसला सोडचिठ्ठी दिली होती.

# शासकीय खुर्चीत बसून गाणे गायल्याने तहसीलदार निलंबित

■ छत्रपती संभाजीनगर

**उमरी** येथे निरोपाच्या कार्यक्रमात तहसीलदाराच्या खुर्चीवर बसून गाणे गाण्याचा मोह एका तहसीलदाराला चांगलाच अंगलट आला आहे. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तातडीने दखल घेत लातूर जिल्ह्यातील रेणापूरचे विद्यमान तहसीलदार प्रशांत थोरात यांना छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी निलंबित केले.

प्रशांत थोरात यांची नुकतीच उमरी (नांदेड) येथून रेणापूर तालुक्यात बदली झाली. उमरी येथे आयोजित निरोप समारंभात त्यांनी तहसीलदारांच्या खुर्चीत बसून 'याद करेगी दुनिया तेरा मेरा अफसाना' हे गीत गायले. सहकाऱ्यांनी त्याचा व्हिडिओ रेकॉर्ड करून समाजमाध्यमांवर टाकला. काही वेळातच हा व्हिडिओ प्रचंड व्हायरल झाला. त्यावर नागरिक व राजकीय कार्यकर्त्यांकडून तीव्र प्रतिक्रिया व्यक्त झाल्या होत्या. शासनाची प्रतिमा मलिन होत असल्याची गंभीर दखल घेत तातडीने ही कारवाई करण्यात आली. निलंबन कालावधीत थोरात यांचे मुख्यालय धाराशिव राहील, जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वसंमतीशिवाय त्यांनी मुख्यालय सोडू नये, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले.


**सूचना**

याद्वारे **सूचना** देण्यात येते की, आमच्या अशिलांनी सध्या यूएई आणि उनैझा अदनान लोखंडवाला येथील निवासी असलेल्या **इम्रान हुसामुद्दिन कपासी** यांच्या कडून सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई - ४०० ०१३ येथे स्थित लोअर परेल विभागाचा सी. एस. क्र. ४६४ धारण केलेल्या जमिनीवर बांधलेल्या दि पार्क, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई येथे स्थित **"लोढा पार्कसाईड"** या इमारतीमधील बी विंगच्या २५ व्या मजल्यावरील सदनिका क्र. २५०१, मोजमाप ८८४ चौ.फू. कार्पेट क्षेत्रफळ व त्यासह एक कार पार्किंग जागा क्र. पी५ ७८७ ही त्यांची सदनिका संपादी करण्यावे मान्य केले आहे. कोणा व्यक्तीचा सदर मालमत्तेविरुद्ध वारसा, गहाणवट, विक्री, भेट, भाडेपट्टी, भाडेकरू, धारणाधिकार, प्रभार, न्यास, देखभाल, वहिवाट या मार्गे किंवा अन्यथा कशाही प्रकारे सदर सदनिका आणि पार्कसाईड सीएचएसएलच्या सदस्यतेवर कोणताही दावा असल्यास त्यांना याद्वारे विनंती करण्यात येते की, त्यांनी त्याबाबत लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकार यांना येथील दिनांकापासून १४ दिवसांच्या आत त्यांच्या कार्यालयात सूचित करावे, अन्यथा कोणत्याही दाव्याच्या संदर्भाशिवाय विक्री पूर्ण करण्यात येईल आणि तो, जर असल्यास, सोडून दिला असे समजण्यात येईल.

**वर उल्लेखिल्यानुसार मालमत्तेची अनुसूची**

सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई - ४०००१३ येथे स्थित लोअर परेल विभागाचा सी. एस. क्र. ४६४ धारण केलेल्या जमिनीवर बांधलेल्या **"लोढा पार्कसाईड"** या इमारतीमधील बी विंगच्या २५ व्या मजल्यावरील सदनिका क्र. २५०१, मोजमाप ८८४ चौ.फू. कार्पेट क्षेत्रफळ व त्यासह एक कार पार्किंग जागा क्र. पी५ ७८७.

दिनांक १८ ऑगस्ट, २०२५

सही/-
**(मे. बिलावाला अँण्ड कं.)**
खरेदीदाराकरिता
**अॅडव्होकेट्स अँण्ड सॉलिसिटर्स**
करीम चेंबर्स, २ रा मजला,
४२, अंबालाल दोशी मार्ग, फोर्ट,
मुंबई-४०० ०२३.

रामेश्वर मीडिया



**सूचना**
**विभागीय संचालक**
**पश्चिम विभाग, मुंबई यांच्या समक्ष**

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३ च्या उप-कलम (४) आणि कंपन्यांचे (स्थापना) नियमन २०१४ च्या नियम ३० च्या उप-नियम (५) च्या खंड (अ) च्या प्रकरणामध्ये

आणि

**कानरा कन्सल्टिंग ॲण्ड सर्व्हिस मॅनेजमेन्ट प्रायव्हेट लिमिटेड** (यापश्चात **'कंपनी'** किंवा **'याचिकाकर्ता कंपनी'** असे उल्लेखित), नोंदणीकृत कार्यालय ५०६-५१३, १७जी, वर्धमान चेंबर्स, कावसजी पटेल मार्ग, मुंबई ४०० ००१ यांच्या प्रकरणात.

सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनी त्यांचे नोंदणीकृत कार्यालय महाराष्ट्र राज्य येथून कर्नाटक राज्य येथे बदलण्यास कंपनीस सक्षम करण्याकरिता शुक्रवार दि. ८ ऑगस्ट, २०२५ रोजी घेण्यात आलेल्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर करण्यात आलेल्या विशेष ठरावानुसार कंपनीच्या मेमोरॅण्डम ऑफ असोसिएशनमधील बदलास मंजुरी मिळविण्याकरिता, कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३ अन्वये विभागीय संचालक यांच्याकडे अर्ज करण्याचे कंपनी प्रस्तावित आहे.

कोणी व्यक्ती, ज्यांचे हितसंबंध कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयाच्या प्रस्तावित बदलामुळे बाधित होत असल्यास त्यांनी गुंतवणूकदार तक्रार अर्ज भरून एमसीए-२१ पोर्टल (www.mca.gov.in) वर कळवावे किंवा त्याचे/तिचे आक्षेप, त्याच्या/तिच्या हितसंबंधाचे स्वरुप आणि विरोधाची कारणे नमूद केलेले प्रतिज्ञापत्र विभागीय संचालक, पश्चिम विभाग यांना सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत स्वतः किंवा अन्य कोणाही तर्फे पोहोचवावे किंवा नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावे व त्याची प्रत याचिकाकर्ता कंपनीस त्यांच्या नोंदणीकृत कार्यालय ५०६-५१३, १७जी, वर्धमान चेंबर्स, कावसजी पटेल मार्ग, मुंबई ४००००१, महाराष्ट्र येथे पाठवावी.

कानरा कन्सल्टिंग ॲण्ड सर्व्हिस
मॅनेजमेन्ट प्रायव्हेट लिमिटेडकरिता
सही/-
सुधाकर पै
संचालक (डीआयएन ०००४३२९८)

दिनांकः १८.०८.२०२५
ठिकाणः मुंबई

